श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ

चर्चासत्राचा अहवाल

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम-२००५

दिनांक २८ सप्टेंबर २०२६

श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालयए यवतमाळ येथील समाजशास्त्र विभागाच्या वतीने “माहितीचा अधिकार अधिनियम- २००५या विषयावर विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. हे चर्चासत्र दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. विशाखा डेरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.या चर्चासत्रासाठी मार्गदर्शक तथा परीक्षक म्हणून प्रा. डॉ. कल्पना गोडघाटे उपस्थित होत्या. कार्यक्रमामध्ये बी.ए. भाग १, भाग २ आणि भाग ३ मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

चर्चासत्रामध्ये विद्यार्थ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ चे महत्त्व, नागरिकांना मिळणारे अधिकार तसेच प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी याविषयी आपली मते मांडली. यावेळी भावना ठाकरे, दीक्षा सरदार, राखी राजूरकर, चैताली उईके,कु. साक्षी तुरंनकर, कु. डिंपल बुरे, कु. अश्विनी वरने, कु. नंदिनी वसावकर, कु. नियती टोंगे, कु. चैताली उईके आणि संजीवनी लोखंडे या विद्यार्थिनींनी चर्चासत्रात सक्रिय सहभाग घेऊन आपली मते व्यक्त केली.

चर्चासत्राच्या शेवटी परीक्षक प्रा. डॉ. कल्पना गोडघाटे यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या सादरीकरणाचे व सहभागाचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ या विषयाची सखोल माहिती मिळाली तसेच सामाजिक आणि प्रशासकीय विषयांवर आपले विचार मांडण्याची संधी मिळाली. एकूणच हे चर्चासत्र विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारे, विचारांना चालना देणारे आणि उपयुक्त ठरले.

श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ

चर्चासत्राचा अहवाल

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम-२००५

दिनांक २८ सप्टेंबर २०२६





चर्चासत्र-महितीचा अधिकार अधिनियम-२००५.दिनांक,२८-०९-२०२८





